# 'कलाकार मानधना'बाबत बातम्यांमधून दिशाभूल

## सांस्कृतिक कार्य संचालनालयाचा खुलासा

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक

समाज माध्यमांतून तसेच काही वर्तमानपत्रांतून कलाकार मानधन योजना अशा मथळ्याखाली 'महाराष्ट्र शासनामार्फत कलाकारांना मानधन' या मथळ्याखाली प्रसिद्धीपत्रके प्रसारित होत आहेत. अशी प्रसिद्धीपत्रके शासनातर्फे प्रसारित करण्यात आली नसून त्यातील माहिती दिशाभूल करणारी असल्याचा खुलासा सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून करण्यात आला.

काही दिवसांपासून राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून राज्यातील मान्यवर वृद्ध साहित्यिक व कलाकार यांना मासिक मानधन देण्याची योजना सुरू झाली असून, त्यासाठी अर्ज करावेत अशी माहिती नाशिक शहरातील असंख्य ग्रुपवर फिरत होती. त्यावर सांस्कृतिक कार्य संचालनालयाने खुलासा केला आहे. इच्छुक कलाकारांनी वर्तमानपत्रातून जिल्हा निवड समितीमार्फत, रीतसर जाहिरात बातमी प्रसारित झाल्यावर, त्या-त्या ठिकाणी अर्ज करावेत, तसेच शासनाने सांगितलेल्या कार्यालयातच जमा करावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाने केले आहे.

---

## शिरवाडकर, कानेटकर, सावंत पुरस्कारांचे

# डॉ. पटेल, हांडे, जोशी मानकरी

नाशिक, ता. २६ : अखिल भारतीय नाट्य परिषद नाशिक शाखेतर्फे दर दोन वर्षांनी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा शाखेचे अध्यक्ष प्रा. रवींद्र कदम यांनी पत्रकार परिषदेत केली. त्यानुसार वि. वा. शिरवाडकर लेखन पुरस्कार लेखक, पटकथाकार, गायक अशोक हांडे, वसंत कानेटकर रंगकर्मी पुरस्कार दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, तर बाबूराव सावंत नाट्यकर्मी पुरस्कार ज्येष्ठ रंगकर्मी सदानंद जोशी यांनी जाहीर झाला आहे. ३१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर १५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र बाबूराव सावंत नाट्यकर्मी पुरस्काराचे स्वरूप असणार आहे.



डॉ. जब्बार पटेल



सदानंद जोशी



अशोक हांडे

परिषदेचे अध्यक्ष प्रा. रवींद्र कदम, प्रमुख कार्यवाह सुनील ढगे, ईश्वर जगताप, विजय शिंगणे, राजेश भुसारे, सुनील परमार यांनी पुरस्कार निवड समितीचे कार्य केले. पुरस्कार वितरण मेअखेर नियोजित असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

सकाळ 27/2/2025

# मराठी नाट्य परिषदेचे पुर…

## अशोक हांडे, जब्बार पटेल, सदानंद जोशी …

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

✦ नाशिक । अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नाशिक शाखेच्या वतीने २ वर्षांनी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा मराठी भाषा गौरव दिनाच्या पूर्वसंध्येला सोमवारी करण्यात आली. २०२४चा वि. वा. शिरवाडकर लेखन पुरस्कार नाटककार व अभिनेता अशोक हांडे, वसंत कानेटकर रंगकर्मी पुरस्कार ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना, तर बाबूराव सावंत नाट्यकर्मी पुरस्कार सदानंद जोशी यांना जाहीर झाल्याची माहिती नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. रवींद्र कदम आणि प्रमुख कार्यवाह सुनील ढगे यांनी नाट्य परिषद कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेच्या वतीने वि. वा. शिरवाडकर आणि वसंत कानेटकर पुरस्कार १९९८ पासून दिले जात आहेत. यंदा पुरस्काराचे १५वे वर्ष आहे. वि. वा. शिरवाडकर लेखन…

---

जागतिक रंगभूमी दिन • 'आईस पत्र' कथेचे अभिवाचन

# बापाच्या पत्रातून आईची मुलीशी भेट

प्रतिनिधी । नाशिक

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नाशिक शाखेच्यावतीने जागतिक रंगभूमी दिनानिमित्त प्रा. रवींद्र कदम यांच्या हस्ते बुधवारी (दि. २७) सायंकाळी ६ :३० वाजता नटराजपूजन करण्यात आले. पल्लवी पटवर्धन लिखित व दिग्दर्शित 'आईस पत्र' या कथेचे अभिवाचन या वेळी करण्यात आले.

अभिवाचक श्रीराम गोरे, प्रांजल सोनावणे, सविता जोशी, पल्लवी पटवर्धन 'आईस पत्र'चे सादरीकरण केले. आईच्या विरहाचे चटके लहानग्या मुलीला बसू नये यासाठी बापाने पत्रलिहिलेल्या पत्रां…




नाट्य परिषद नाशिक आयोजित 'आईस पत्र' कथेचे बुधवारी अभिवाचन करताना श्रीराम गोरे. शेजारी प्रांजल सोनावणे, सविता जोशी, पल्लवी पटवर्धन आदी.

आईची मुलीशी होणारी भेट उपस्थितांना भावनावश करून गेली. संगीत ऋतुगंधा पटवर्धन यांचे होते. नाट्य परिषदेच्या हॉलमध्ये झालेल्या उपक्रमास नाशिककर नाट्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्ष प्रा. रवींद्र कदम यांनी सहभागी कलावंतांचा सन्मान केला. प्रमुख कार्यवाह सुनील ढगे, पदाधिकारी विजय शिंगणे, मोहिनी भगरे, ईश्वर जगताप आदी उपस्थित होते.

# अखेरच्या दिवशी पाच एकांकिकेचे सादरीकरण

## उत्सुकता निकालाची; आज पारितोषिक वितरण

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २९: अखिल भारतीय नाट्य परिषद नाशिक शाखेच्या वतीने अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा (ता. २७) पासून कालिदास कलामंदिर येथे सुरू आहेत. बुधवारी (ता. २९) सात एकांकिकांनी सादरीकरण करत प्रेक्षकांची मने जिंकली तर गुरुवारी (ता. ३०) पाच एकांकिका सादर होणार असून स्पर्धेचा पारितोषिक वितरण सभारंभ रात्री साडेसातला वाजता होणार आहे.

मुंबईच्या नक्षत्र कलामंच संघाच्या 'अल्पविराम' एकांकिकेपासून स्पर्धेला सुरवात झाली. आजारामुळे अंथरुणाला खिळलेल्या आईच्या मनातले कोणाला ओळखता आले ? भावनांच्या बंधनात राहून माधवीला तिच्या आईच्या शेवटच्या श्वासापर्यंत तिचा उपचार करायचा आहे तर मिहिरला आईची लाइफ सपोर्ट सिस्टिम काढून टाकण्याचा विचार करतोय शेव... ने... न ही एकां...



**महाकवी कालिदास कलामंदिर :** कै. अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत नाटक सादर करताना कलावंत. (छायाचित्र : विकी कदम)

खिळवून ठेवते.

आयुष्यात सगळ संपल्यानंतर अशी कुणीतरी व्यक्ती हवी की जी आपल्याला म्हणेल की "मी आहे ना" काळजी नको करू दुःखावरती सुखाची फुंकर घालायला 'मैं हुं ना' एकांकिका लादलेली बंधने, ही पुरूषांच्या विचारात अडकलेली असतात. जेव्हा विचार नदी सारखे मोकळे होतात, तेव्हा बाईच आयुष्य समुद्राशी मिळते या विषयावर रसाभिनय नगर संस्थेच्या 'आता वाजव' एकांकिका सादर केली. आहे. भारत धमार्वर प्रेम आहे. कारण 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' ही संकल्पना खरा तो एकची एकांकिकेत मांडण्यात आली. त्यानंतर अनुक्रमे कलासक्त मुंबई संस्थेने संपर्क क्रमांक, कलरफूल माँकने द कॅमेलन,

### आज सादर होणाऱ्या एकांकिका

- पाकळ्या : दुपारी ११
- तू तेव्हा तशी : दुपारी १२.१५
- फक्त २ मिनिटं : दुपारी १.३०
- पाटी : दुपारी २.४५
- इंट्रोग्रेशन : सायंकाळी ४.३०

# मानवी मनातील कल्लोळाच्या कहाण्या

### नाट्य परिषदेच्या स्पर्धेतील एकांकिकांतून भाष्य

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

मानवी मनाच्या, त्यातील कल्लोळाच्या, घालमेलीच्या, आयुष्यावर लादलेल्या बंधनातून मोकळ्या होणाऱ्या स्त्रीच्या, दुःखावर सुखाची फुंकर घालणाऱ्या माणसांच्या कहाण्या मांडणाऱ्या एकांकिकांनी प्रेक्षकांची दाद घेतली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेच्या वतीने महाकवी कालिदास कलामंदिरात आयोजित अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत बुधवारी (दि. २९) सात एकांकिका सादर झाल्या. मुंबईच्या नाट्य कलामंच संस्थेच्या वतीने 'अल्पविराम' या इरफान मुजावर लिखित व साहिल पवार दिग्दर्शित एकांकिकेतून आजारामुळे अंथरुणाला खिळलेल्या आईवरून भाऊ-बहिणीच्या मनात रंगलेले द्वंद्व मांडण्यात आले. सानिका सावे, तृषांतू बोवडे यांच्या भूमिका होत्या. सोलापूरच्या वैभवदीप नाट्य संस्थेने दीपक शिंदे लिखित व मोहिनी जोशी दिग्दर्शित 'मैं हूं ना' एकांकिका सादर केली. नगरच्या रसभिनय संस्थेच्या वतीने 'आता वाजव!' या पवन पोटे लिखित व दिग्दर्शित एकांकिकेतून बंधमुक्त झालेल्या स्त्रीचे विश्व चितारण्यात आले. नगरच्या 'तुमचं-आमचं' संस्थेच्या वतीने कृष्णा वाळके लिखित व दिग्दर्शित 'खरा तो एकचि' या एकांकिकेतून प्रेम हाच खरा धर्म असल्याचे मांडण्यात आले. ओम सैंदाणे, अंतरा वाडेकर, तनिष्का देशमुख, प्रतीक अंदुरे यांच्या भूमिका होत्या. भाऊ-बहिणीच्या मनातील कल्लोळाची

पंकज चांडोले



कहाणी 'दिन तैशी रजनी' या मयुरेश पंडित दिग्दर्शित एकांकिकेतून मांडण्यात आली. श्रुती देवळेकर, नितीन शिनारे, मानस दामले यांनी भूमिका साकारल्या. मुंबईच्या 'कलासक्त' संस्थेच्या वतीने 'संपर्क क्रमांक' एकांकिका सादर करण्यात आली. पूर्वाश्रमीच्या प्रसिद्ध अभिनेत्रीला समाजमाध्यमातून भेटायला आलेल्या जुन्या चाहत्याची गोष्ट त्यात सादर करण्यात आली. संदेश जाधव लिखित व योगेश कदम दिग्दर्शित या एकांकिकेत डॉ. यशश्री कंटक, गौरव मोरे यांच्या भूमिका होत्या. 'कलरफुल मॉन्क' संस्थेतर्फे 'द शॅमेलियन' ही एकांकिका सादर करण्यात आली. भावेश कुंटला, ओमकार भगत, सिद्धी शिंदे, नचिकेत दांडेकर यांच्या भूमिका होत्या. दरम्यान, या स्पर्धेत आज (दि. ३०) पाच एकांकिका सादर होणार असून, सायंकाळी ७.३० वाजता पारितोषिक वितरण केले जाणार आहे.

अनंत कुबल एकांकिका स्पर्धा : नक्षत्र कलामंचच्या कलावंतांचे सादरीकरण

# 'अल्पविराम' एकांकिकेतून भावना की प्रॅक्टिकॅलिटी? केले यावर भाष्य

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : आजारामुळे अंथरुणाला खिळून राहिलेल्या आईच्या मनातलं कोणाला ओळखता आले आहे? भावनांच्या बंधनात राहून माधवीला तिच्या आईच्या शेवटच्या श्वासापर्यंत तिचा उपचार करायचा आहे. आणि दुसऱ्या बाजूला मिहिर जो प्रॅक्टिकल वागणारा आहे. आईची लाइफ सपोर्ट सिस्टिम काढायचा विचार करतोय. शेवटी कोण जिंकेल भावना की प्रॅक्टिकॅलिटी? यावर अल्पविराम एकांकिकेतून भाष्य करण्यात आले आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नाशिक शाखेतर्फे सोमवार (दि. २७) पासून महाकवी कालिदास कलामंदिरात अनंत कुबल एकांकिका स्पर्धेस सुरुवात करण्यात आली आहे. बुधवारी (दि. २९) नक्षत्र कलामंचच्या 'अल्पविराम' एकांकिकेचे सादरीकरण करण्यात आले.



अल्पविराम एकांकिकेचे सादरीकरण करताना कलावंत.

## 'या' एकांकिकांचे झाले सादरीकरण

एम्पिरिकल फाउंडेशनचे 'भेट भेट', दीपक मंडळाचे 'कोहम', पुणे येथील मुक्ताई फाउंडेशनचे 'मून विदाउट स्काय', रसभिनय, अहमदनगरचे 'आता वाजव, तुमचं आमचं', अहमदनगरचे 'सारा तो एकांत' यांचा समावेश होता.

- आजच्या सादर होणाऱ्या एकांकिका : नाट्य परिवार, ठाणे (पाकळ्या), स्टोरिया प्रॉडक्शन (तू तेव्हा तशी), स्वामी नाट्यांगण, डोंबिवली (फक्त २ मिनिटं), एकदम कडक नाट्यसंस्था (पाटी)
- इरफान मुजावर यांनी लेखन केले आहे. तर साहिल पवार यांनी दिग्दर्शन केले आहे. या एकांकिकेत सानिका सावे, तृषातू बोबडे यांनी भूमिका साकारल्या आहेत. संगीत संयोजन अक्षय धांगट तर नेपथ्य संयोजन देवेंद्र देवरुखकर यांनी केले होते.

# एकांकिकांतून सामाजिकतेवर भाष्य

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

सतीश काळे



शाळेत विद्यार्थ्यांच्या वार्षिकदिवसनिमित्त ड्रेस कोड दिली जाते. ती एका विशिष्ट धर्माचे प्रतिनिधित्व करीत असल्याने ती लावायची का नाही यावर विचार सुरू होतो. समाजात धार्मिक विषमता प्रचंड वाढली आहे. त्यामुळे माणूस एकमेकांना वेगळ्या 'लेबल'मधूनच बघत आहे. 'लेबल' या एकांकिकेतून आजूबाजूला सुरू असलेल्या घटनांचा ऊहापोह करण्यात आला.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेतर्फे आयोजित चार दिवसीय अनंत कुबल एकांकिका स्पर्धेला सोमवारपासून सुरुवात झाली. मंगळवारी स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी महाकवी कालिदास कलामंदिरमध्ये 'लेबल', 'कोहम', 'आर यू ब्लाइंड?', 'मून विदाउट स्काय' या एकांकिका सादर झाल्या. यावेळी निर्मिती नाट्य संस्था सातारा संस्थेतर्फे नीलेश माने लिखित आणि दिग्दर्शित 'लेबल' नाटकात धर्मावर भाष्य करण्यात आले. त्यात भक्ती झणझणे, सचिन सावंत, स्नेहा धडवई, प्रवीण यादव, नीलेश माने, अजीम पटेल, हणमंत शिंदे यांनी सहभाग घेतला. याचबरोबर मुक्ताई फाउंडेशन, पुणे या संस्थेतर्फे लेखक प्राजक्त देशमुख लिखित 'मून विदाउट स्काय' या नाटकातून १९३३ साली जर्मनीमध्ये ज्यू लोकांचे जे हाल झाले त्यावर भाष्य करण्यात आले.

दीपक मंडळ सांस्कृतिक विभाग, नाशिकतर्फे 'कोहम' हे नाटक सादर झाले. डॉ. समीर मोने यांनी नाटकाचे लेखन केले, तर सचिन रहाणे यांनी दिग्दर्शन केले. विशाल कदम लिखित आणि विक्रम पाटील दिग्दर्शित 'आर यू ब्लाइंड' या नाटकात आदिवासी बांधवांच्या समस्यांचे वर्णन करण्यात आले.

विद्या से यदि भगवद्भक्ति न जागत हो तो ऐसी विद्या श्रममात्र ही

# एकांकिका स्पर्धा हा रंगभूमी कलाकाराचा पाया

## निर्मला कुबल : अ. भा. नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धेला प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. २७ : शहराला रंगभूमीचा मोठा इतिहास आहे. येथील कलाकारांनी मराठी रंगभूमी समृद्ध केली. मराठी रसिकाला नाटकांची भूक आहे आणि रसिकांच्या प्रोत्साहनामुळे नाटक आणि एकांकिका स्पर्धा यशस्वी होतात. म्हणूनच कोणत्याही रंगभूमीच्या कलाकारासाठी एकांकिका या पायाभरणीचे काम करीत असल्याचे विचार ज्येष्ठ रंगकर्मी निर्मला कुबल यांनी व्यक्त केले.**

अखिल भारतीय नाट्य परिषद नाशिक शाखेतर्फे अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेला महाकवी कालिदास कलामंदिर नाट्यगृहात प्रारंभ झाला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वास ठाकूर, परिषदेचे अध्यक्ष प्रा. रवींद्र कदम, उपाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, उपाध्यक्ष शाहू खैरे, कार्यवाह सुनील ढगे, विश्वजित धर्माधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्री. ठाकूर म्हणाले, आयोजक मोठ्या कष्टाने स्पर्धा घेतात पण त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रेक्षकच उपस्थित नसतात. परिषदेने महाविद्यालयांमध्ये जाऊन नाट्य स्पर्धांचे मेळावे घ्यावे. त्यातून त्यांना रंगभूमीचे व्यासपीठ उपलब्ध होईल, नाटक काय असते, रंगभूमी काय असते त्याची जाणीव होईल.

स्पर्धेचे अकरावे वर्ष असून चार दिवस रंगणाऱ्या स्पर्धेत राज्यभरातून २५ एकांकिका सहभागी झाल्या आहेत. परीक्षक म्हणून अनिल बांदवडीकर, शुभांगी पाठक, श्रीराम खाडीलकर काम बघत आहेत. स्वागत प्रास्ताविक सुनील ढगे यांनी तर केतकी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.



कालिदास कलामंदिर : (कै.) अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेतील क्षण.

### 'बेटर लेट दॅन नेव्हर'ने स्पर्धेला प्रारंभ

रंगायन आर्ट्स प्रस्तुत हर्षदा बोरकर लिखित व योगेश केळकर दिग्दर्शित "बेटर लेट दॅन नेव्हर" या एकांकिकेने स्पर्धेला सुरवात झाली. नेहमीच कम्फर्ट झोनमध्ये राहण्याचा प्रयत्न करीत असताना नियतीला ते मान्य नसते. मग नियती मित्र, वाटाड्या, तत्त्वज्ञ बनून समोर येते व माणसाला योग्य जागी नेऊन सोडते अशा आशयाची ही एकांकिका होती. केटीएचएम महाविद्यालयाने सादर केलेल्या "दूत" एकांकिकेत समाजात घडत असलेल्या बदलांवर आधारित लोकांचा दृष्टिकोन व त्याचा होणारा परिणाम दाखविण्याचा प्रयत्न केला होता. नाटकाचे लेखन व दिग्दर्शन प्रथमेश घुगे यांनी केले होते. नम्रता कलाविष्कार संस्थेने "कातळझिरा" एकांकिका सादर केली. शेतात खणताना सख्याला कातळ दगडाची विठ्ठल मूर्ती सापडते. त्यानंतर तो विठ्ठल भक्तीत रममाण होतो व त्याचे कुटुंबाकडे दुर्लक्ष होत जाते. एक दिवस सरकारी अधिकारी येऊन ती मूर्ती सरकार दरबारी घेऊन जाण्यासाठी येतात. त्यावेळी सख्याला जीवनातील क्षणभंगुरतेचे महत्त्व समजते आणि तो पुन्हा संसारात मग्न होतो. मोहिनीदेवी रुंगटा हायस्कूलने ज्ञानेश्वरी शिंदे लिखित व दिग्दर्शित "विडोज ९८" ही एकांकिका सादर केली. ज्यांच्यावर जिवापाड प्रेम असते, त्यांची काळजी घेतो. त्यांना आपल्या पालकांची काहीही काळजी नसते का मुलांना नेमके काय हवे हे सांगणारी ही एकांकिका लक्षवेधी ठरली.

### आज सादर होणाऱ्या एकांकिका

| | |
|---|---|
| व्हॉट्सअॅप बडी | दुपारी ३.३० |
| सेकंड चान्स | दुपारी ४.४५ |
| ग्रेट भेट | सायंकाळी ६ |
| दिन तौशी रजनी | सायंकाळी ७.१५ |
| कोहम | रात्री ८.३० |
| मून विदाउट स्काय | रात्री ९.४५ |

# नाट्य परिषदेच्या पुरस्कारांची घोषणा

## प्रवीण काळोखे, प्राजक्त देशमुख यांचा समावेश


प्रवीण काळोखे


प्राजक्त देशमुख


हेमंत देशपांडे


हेमलता चौधरी

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेच्या वतीने मराठी रंगभूमी दिनानिमित्त दरवर्षी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा गुरुवारी (दि. ३१) करण्यात आली. दिग्दर्शक प्रवीण काळोखे, लेखक, दिग्दर्शक, अभिनेते प्राजक्त देशमुख, अभिनेते हेमंत देशपांडे आदींना हे पुरस्कार जाहीर झाले असून, येत्या मराठी रंगभूमीदिनी (दि. ५ नोव्हेंबर) महाकवी कालिदास कलामंदिरात सायंकाळी ६ वाजता 'बालरंगभूमी'च्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते त्यांचे वितरण केले जाणार आहे.

नाट्य परिषद नाशिक शाखेचे अध्यक्ष रवींद्र कदम, प्रमुख कार्यवाह सुनील ढगे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुरस्कार विजेते असे : दत्ता भट स्मृती पुरस्कार (अभिनय, पुरुष) : हेमंत देशपांडे, शांता जोग स्मृती पुरस्कार (अभिनय, स्त्री) : हेमलता चौधरी, प्रभाकर पाटणकर स्मृती पुरस्कार (दिग्दर्शन) : प्रवीण काळोखे, नेताजी भोईर स्मृती पुरस्कार (लेखन) : गिरीश जुन्नरे, वा. श्री. पुरोहित स्मृती पुरस्कार (बालरंगभूमी) : किरण कुलकर्णी, जयंत वैशंपायन स्मृती पुरस्कार (सांस्कृतिक पत्रकारिता) : सुधीर कुलकर्णी, सुमन माटे स्मृती पुरस्कार (पार्श्वसंगीत व नाट्यसंगीत) : यशवंत खाडिलकर, डॉ. रामदास बरकले स्मृती पुरस्कार (लोककला) : उमेश गायकवाड, शाहीर गजाभाऊ बेणी स्मृती पुरस्कार (लोकशाहिरी) : शाहीर रवींद्र बराते, नारायण देशपांडे स्मृती पुरस्कार (रंगकर्मी कार्यकर्ता) : कैलास डिडवाणी, रंगतपस्या पुरस्कार (अभिनय, दिग्दर्शन, लेखन) : प्राजक्त देशमुख.

प्रत्येकी दोन हजार रुपये व मानचिन्ह असे या पुरस्कारांचे, तर अकरा हजार रुपये व मानचिन्ह असे रंगतपस्या पुरस्काराचे स्वरूप आहे. याशिवाय मुक्तेश्वर मुनशेट्टीवार (सामाजिक), संजय जरीवाला (सांस्कृतिक), डॉ. पल्लवी धर्माधिकारी (वैद्यकीय) यांनाही विशेष योगदानाबद्दल गौरवण्यात येणार आहे.

पुरस्कार निवड समितीत कदम, ढगे यांच्यासह नाट्य परिषदेचे खजिनदार ईश्वर जगताप, सहकार्यवाह विजय शिंगणे, राजेश भुसारे यांचा समावेश होता. पुरस्कार वितरण कार्यक्रमानंतर मराठी भावगीतांचा कार्यक्रम सादर होणार आहे. पत्रकार परिषदेवेळी वरुण भोईर, सुनील परमार, विनोद राठोड, पीयूष नाशिककर आदी उपस्थित होते.

### 'बागेश्री'तर्फे नांदी

पुरस्कार वितरण कार्यक्रमात बागेश्री वाद्यवृंदाच्या वतीने 'संगीत शाकुंतल' नाटकातील १४४ वर्षांपूर्वीची नटराजाची नांदी सादर केली जाणार आहे. चारुदत्त दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली सुप्रिया दाणी, साक्षी झेंडे, नूतन काळे, ऋचा झेंडे, वैष्णवी अहिरराव, अंजली जोशी आदी कलावंत नांदी सादर करतील.

(अभिनय-स्त्री) : हेमलता चौधरी, स्व. नारायण देशपांडे स्मृती ... कैलास डिडवाणी यांना पुरस्कार देण्यात

प्रा. रवींद्र कदम यांनी गुरुवारी स्व. प्रभाकर पाटणकर स्मृती कार्यकर्ता): कैलास डिडवाणी, ...लेखन प्राजक्त देशमुख येणार आहे

TODAY नाशिक, शनिवार, १ जून २०२४ सकाळ

# राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत 'पाटी' प्रथम

## नाट्यसंहितांचे व्हावे डिजिटायझेशन : भुरे

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ३१ : अखिल भारतीय नाट्य परिषद, नाशिक आयोजित अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत २५ एकांकिकांमधून पाटी एकांकिकेने प्रथम क्रमांक मिळवत २५ हजारांचे बक्षीस पटकावले. क्रिएटिव्ह कार्टी संस्थेच्या इंट्रोगेशन एकांकिकेने द्वितीय क्रमांक मिळवत २० हजार रुपये, तर निर्मिती नाट्य संस्थेच्या लेबल एकांकिकेने १५ हजार रुपयांचे बक्षीस मिळविले.




महाकवी कालिदास कलामंदिर : अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी विजेत्यांसह उपस्थित मान्यवर.

सोमवारपासून सुरू असलेल्या या स्पर्धेचे पारितोषिक वितरण (ता. ३०) कालिदास कलामंदिर येथे झाले. नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती शाखेचे प्रमुख कार्यवाह अजित भुरे, अभिनेता चिन्मय उदगीरकर, नाशिक शाखेचे अध्यक्ष प्रा. रवींद्र कदम, उपाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, राहू खैरे, प्रमुख कार्यवाह सुनील ढगे उपस्थित होते. अनिल बांदिवडेकर, शुभांगी पाठक, श्रीराम खाडिलकर परीक्षक होते. आनंद जाधव यांनी आभार मानले.

### नाट्यसंहितांचे संकलन कौतुकास्पद : भुरे

नाशिक शाखेने नाट्य संहितांचे केलेले संकलन कौतुकास्पद आहे. याचा रंगभूमीवरील नवोदित कलाकारांना संदर्भ म्हणून खूप उपयोग होणार आहे म्हणूनच या नाट्य संहितांचे डिजिटायझेशन व्हायला हवे त्यासाठी मध्यवर्ती शाखा सर्वोतोपरी मदत करण्यासाठी तयार असेल असे आश्वासन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले श्री. भुरे यांनी दिले.

**स्पर्धेचा निकाल असा : (प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे)**

- एकांकिका : पाटी (एकदम कडक नाट्यसंस्था), इंट्रोगेशन (क्रिएटिव्ह कार्टी), लेबल (निर्मिती नाट्य संस्था)
- अभिनय (पुरुष) : औदुंबर बाबर (पाटी), सचिन सावंत (लेबल), योगेश कदम (इंटरोगेशन)
- अभिनय (स्त्री) : राजश्री जमदाडे (लेबल), विजया गुंडप (पाटी), स्नेहा घडवई (लेबल)
- दिग्दर्शन : प्रणय गायकवाड (पाटी), योगेश कदम (इंटरोगेशन), डॉ. नीलेश माने (लेबल)
- प्रकाशयोजना : श्याम चव्हाण (संपर्क क्रमांक), निखिल मारणे (लेबल), साई शिर्लेकर (पाटी)
- नेपथ्य : सुमित-महेश (मुन विदाउट स्काय), वेदांत पाथरकर (विन तैशी रजनी), कोहम चव्हाण, विनय कटारे (कोहम)
- पार्श्वसंगीत : कुमार मोने (लेबल), रोहित सरोदे (मुन विदाउट स्काय), सचिन रहाणे (कोहम)
- सर्वोत्कृष्ट लेखन : प्रथम डॉ. नीलेश माने (लेबल)

लोकमत

# कुबल एकांकिका स्पर्धेत 'पाटी'ची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेच्या वतीने झालेल्या स्व. अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत एकदम कडक नाट्यसंस्थेच्या 'पाटी' या एकांकिकेने बाजी मारली. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कारदेखील पाटीचे दिग्दर्शक प्रणव गायकवाड यांना तर सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पुरस्कार पाटीतील अभिनेता औदुंबर बाबर आणि इंटरोगेशन नाटकातील अभिनेत्री राजश्री जमदाडे यांनी पटकावला. अभिनेते दिग्दर्शक अजित भुरे आणि चिन्मय उद्गीरकर यांच्या उपस्थितीत पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

कालिदास कलामंदिरात झालेल्या या पुरस्कार प्रदान सोहळ्याप्रसंगी बोलताना भुरे यांनी एकांकिका स्पर्धांमधूनच खरा कलावंत घडत असल्याचे सांगितले. तर चिन्मय उद्गीरकर यांनी स्पर्धेला वर्षागणिक मिळणारा वाढता प्रतिसाद निश्चितच आशादायक असल्याचे नमूद केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत परिषदेचे अध्यक्ष रवींद्र कदम यांनी तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्रमुख कार्यवाह सुनील ढगे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, शाहू खैरे आदी मान्यवर उपस्थित होते.




'पाटी' या एकांकिकेला सर्वोत्कृष्ट एकांकिकेचा पुरस्कार प्रदान करताना चिन्मय उद्गीरकर. समवेत परिषदेचे अध्यक्ष रवींद्र कदम, प्रमुख कार्यवाह सुनील ढगे, डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, शाहू खैरे आदी. (छाया : नीलेश तांबे)

# 'माजिक विषयांवर एकांकिकांमधून प्रकाश

## नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धांना प्रारंभ

प्रतिनिधी, नाशिक



नाट्य परिषदेच्या स्व. अनंत कुबल एकांकिका स्पर्धेतील एका नाटकातील क्षण.

जगण्याचे आयाम कसे बदलत जातात, ते बदलत असताना सामाजिक भान कसे राखले गेले पाहिजे आणि त्यातही जगण्याच्या चक्रात माणूस, निसर्ग कसा केंद्रबिंदू असतो अशा एकांकिकांनी नाट्य परिषदेच्या स्व. अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा पहिला दिवस गाजला.

पहिल्या दिवशी ६ एकांकिकांचे सादरीकरण झाले. त्यात रंगाश्रम आर्टसने 'बेटर लेट दॅन नेव्हर' ही एकांकिका सादर करून निवती आणि माणसाचे जगणे यावर भाष्य केले. त्यानंतर सादर आलेल्या 'दूत' या एकांकिकेत घडत असलेले बदल, भक्तिभाव आणि सामाजिक दृष्टिकोन याचा एकूणच जो परिणाम होतो त्याची मांडणी करण्यात आली. 'कातळशिरा' या एकांकिकेतून कर्म आणि भक्तिमार्ग सादर करताना जगण्यासाठी कर्माचा सिद्धांत महत्त्वाचा असल्याचे अधोरेखित केले गेले. तर 'विंडोज ९८' या एकांकिकेतून पालक नक्की चुकतात कुठे हे दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला. नटराज वंदना नृत्य नाट्य निकेतनने 'अयाती पर्व' ही एकांकिका सादर केली. यातून महाभारत युद्ध हे एक ज्वलंत पर्व! ज्या युद्धात कोण जिंकले कोण हरले यापेक्षा कोण भरडले गेले? सामान्य माणसाला त्या राजघराण्याच्या वादात कित्येक यातना भोगाव्या लागल्या यावर भाष्य करण्यात आले. दिव्य फाउंडेशनने सादर केलेल्या 'शक्ती संपन्न संस्थिता' या एकांकिकेत अन्याय आणि तो दूर करण्यासाठी आपल्यातीलच शक्ती जागी करावी लागते असा संदेश देण्यात आला.

## कलाकार, साहित्यिकांमुळे होते सिटी स्मार्ट : ठाकूर

एखादी कृती सातत्याने करणे महत्त्वाचे असते. नाट्य परिषद गेल्या ९ वर्षांपासून ही स्पर्धा भरवून कलाकारांना व्यासपीठ देत. तरी या स्पर्धेसाठी पालिका नाट्यगृहाचे भाडे आकारते. खरेतर ही पालिकेची नैतिक जबाबदारी आहे. मोठी कामे जशी महत्त्वाची असतात तसेच कलाकार आणि साहित्यिकांमुळेच एखादे शहर 'स्मार्ट सिटी' होते. नवीन पिढीचे काय होणार याची चिंता करण्याची गरज नाही. ती पिढी नाटकांमध्ये उत्तम काम करत असल्याचे विश्वास ठाकूर यांनी उद्घाटनात व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर निर्मला कुबल, डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, शाहू खैरे, प्रा. रवींद्र कदम, सुनील ढगे उपस्थित होते. यावेळी स्पर्धेचे पुढील वर्ष १० वे आहे. त्यानिमित्त एकांकिकांचा कुंभमेळा भरविण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे कदम यांनी व्यक्त केले.

## आजच्या एकांकिका

तुतारी फाउंडेशन कॉलेजमधून कॉट्स ॲंड वड्डी, सेकंड चान्स, ग्रेट भेट, दिन दैनी रजनी, ओहम, मून विदाउट स्काय या एकांकिका कालिदास कलामंदिरात सादर होणार आहेत.